# गाभण गाईची काळजी

**डॉ. चैतन्य पावशे**
पशुजनन, मादीरोग व प्रसुतीशास्त्र विभाग
स्नातकोत्तर पशुवैद्यक व पशु विज्ञान संस्था, अकोला.

कृत्रिम रेतन केल्यानंतर गाय जर पुन्हा २१ दिवसांनी माजावर आली नाही तर पशुवैद्यकाकडुन २ ते ३ महिन्यांनी गाय गाभण आहे याची खात्री करावी. भाकड, दूध देणाऱ्या व गाभण गाईच्या आहारातील गरजा या वेगवेगळ्या असतात. गाभण गायीसाठी संतुलित व योग्य आहार देणे आवश्यक आहे. संतूलीत आहारामुळे गर्भातील वासराची वाढ चांगली होते तसेच गायीमध्ये दूध निर्मिती प्रक्रिया चांगली राहते व व्याल्यानंतर गाय भरपूर दूध देते. गर्भातील वासराची वाढ ही सहाव्या महिन्यापासुन जलद गतीने होत असल्याने खालील प्रमाणे गाभण गाईची काळजी घ्यावी.

- गाभण गाईंना सहा महिन्यानंतर दूरवर चरण्यास सोडू नये.
- सहा महिन्यापासून गाईचे दूध एकवेळेस काढावे व सातव्या महिन्यात गाय आटवावी. गाय आटवल्यानंतर सडामध्ये प्रती जैवके सोडावीत.
- गाभण गाईला स्वच्छ पाण्याचा पुरवठा करावा.
- गाभण गाईला बसण्यास व उभे राहण्यास पुरेशी व आरामशीर जागा असावी.
- गाभण गाईस सतत एका ठिकाणी बांधून ठेवू नये, त्यांना थोडासा व्यायाम द्यावा.
- गोठयातील जमीन समतोल असावी, ती उतरती असू नये त्यामुळे गर्भाशय बाहेर येण्याची शक्यता असते.
- गाभण गायींना सहा महिन्यानंतर १ ते १.५ कि.ग्रॅ. अतिरिक्त पशु खाद्य/ खुराक/ आंबोण दररोज द्यावे, तसेच ५० ग्रॅम क्षार मिश्रण खुराकासोबत द्यावे.
- विण्याच्या अगोदर गाईला १० ते १५ दिवस सुरक्षित व वेगळ्या ठिकाणी बांधावे व हालचालीवर बारकाईने लक्ष द्यावे.